पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दि. २६/०७/२०२४**

**मा. राष्ट्रपती महोदय, यांचे पुणे दौऱ्याचे अनुषंगाने मौजे नांदेगांव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे या मार्गावरील हलकी, जड, जवजड वाहतुक वळविलेबाबत..**

सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी, लवळे पुणे येथे दिनांक २९/०७/२०२४ रोजी मा. राष्ट्रपती महोदय, भारत सरकार यांचा दौरा असल्याने दौरा मार्गावर वाहतुक कोंडी होऊ नये व कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी याकरीता उपाययोजना म्हणून मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडील जा.क्र पगक/कावि/३१४६/२०२४ दिनांक २५/०७/२०२४ अन्वये खालील प्रमाणे दिनांक २९/०७/२०२४ रोजी पहाटे ००.०१ वाजेपासून दुपारी १६.०० वाजेपर्यंत दौरा मार्गावरील वाहतूक वळविलेबाबतची अधिसुचना प्रसारित केलेली आहे.

- मौजे नांदेगाव- सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे मार्गावरील सर्व प्रकारची हलकी, जड-अवजड वाहनांची वाहतुक बंद केली असून सदर मार्गावरील वाहतूक नांदेगाव-माले येथून हिंजवडी मार्गे पुणे तसेच नांदेगाव-पिरंगुट-चांदणी चौक मार्गे पुणे अशी वळविण्यात आलेली आहे.

तरी नागरीकांनी मौजे नांदेगाव - सनीजवर्ल्ड व सुस मार्गे पुणे बाजुकडे न जाता त्यांनी नांदेगाव-माले येथून हिंजवडी मार्गे पुणे तसेच नांदेगाव-पिरंगुट-चांदणी चौक मार्गे पुणे या पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेमार्फतीने करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी-चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे
प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
२) प्रभारी अधिकारी बावधन वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड
/- नमुद अधिसुचनेप्रमाणे योग्य तो बंदोबस्त नेमुन मा. राष्ट्रपती महोदय, यांचे दौरा मार्गावर हलकी, जड-अवलड वाहने येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.